
# राजप्रतिपत्य

प्रद्युम



**बारावीत** शिकत असलेल्या एका मुलाने लिहीलेली ही ऐतिहासिक कादंबरी. एका भव्य कादंबरीचा शुभारंभ. तसेच एका लेखकाच्या जीवनकार्याचाही हा शुभारंभ असू शकतो.

ही तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या महाकादंबरीच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं. ती महाकादंबरी सर्वार्थाने "महा" होण्यासाठी.

वाट पहातो. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र. आणी शक्य असल्यास प्रत्यक्ष भेट. कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.

प्रद्युम राकेश चिलकेवार

39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर

भ्रमण ध्वनी -9307537644

ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com

## लेखक परिचय



प्रद्युम राकेश चिलकेवार 'कवि पूरब'.

वय- १७

39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर

शिक्षण- संजूबा हाय स्कूल ११ वी.

प्रथम पुस्तक 'आहुत्य' -

https://www.amazon.in/Ahutya-Pradyum-Chilkewar/dp/B09HR3MWD3/ref=mp_s_a_1_1?crid=4RAWN0GTZJUW&keywords=pradyum+chilkewar&qid=1638810466&sprefix=pradyum+chilkewa%2Caps%2C439&sr=8-1

Youtube channel - kavi purab

https://youtu.be/lWbMP6h4K1Y

भ्रमण ध्वनी -9307537644

ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# राजप्रतिपत्य

(लघुकादंबरी)

लेखक : प्रद्युम पूरब

# राजप्रतिपत्य

लेखक प्रद्युम पूरब
**भ्रमण ध्वनी -9307537644**
**ई-मेल- pradyumchilkewar3@gmail.com**
**पत्ता – 39 साई नगर, उमरेड, दिघोरी, नागपूर.**

मुखपृष्ठ: प्रद्युम चिल्केवार

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : २९ मे २०२२,
( वैशाख कृष्ण चतुर्दशी १९४४ )

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखकाचे दोन शब्द –

फार छान वाटतं कि आयुष्यात अशी देखील लोकं मिळतात जे आपल्या कलेला प्रोत्साहन देतात. आणि ते मला मिळाले/ फार उत्कट आणि निराळ्या 'online' पद्धतीत - ई-साहित्य! माझ्याकडे बोलण्याइतपत अश्या काही मोठ्या गोष्टी नाहीत. केवळ आहे ते एक बालमन. थोडं विचित्र नि थोडं विचित्रच!


माझी आवड - वाचन आणि लेखन. कादंबऱ्या, काव्य नि कविता हेच माझे आई-वडील, गुरु आणि आयुष्य. कविवर्य बा.भ बोरकर हे माझे सर्वात आवडते कवी. शिवाय तुकोबांचे अभंग देखील माझे फार आवडते आहे. मला आताही माझ्या आठव्या वर्गातील असलेली सर्वात पहिली तुकोबांची संतवाणी - 'आम्हा घरी धनं शब्दांची रत्ने …' ही आठवते. नि आयुष्याची रूळ देखील याच आठवणीतील गुंतलेली आहे.

वाचकांनो, मला काही नकोय, फक्त तुमचा प्रतिसाद हवंय. लेखनातील तोटा, आपली मतं, लेखन, शब्द नि कल्पना आपणास कशी वाटली हे जर स्वतंत्रपणे कळले तर फारच छान!

धन्यवाद !

# प्रद्युम चिल्केवार यांची ई साहित्यवरची आधीची पुस्तके

**Click on the cover to open the book**







सादर अर्पण-

# शिवव्याख्याते

# बाबासाहेब देशमुख

यांचे चरणी



# राजप्रतिपत्य

प्रद्युम

# साठ कब्र

बिजापुरात भीतीचे धुकं दाटले होते. दक्खनी आदिलशाही सल्तनत मराठ्यांच्या सतत तुफानी पराक्रमाने दिवसेनदिवस प्रतिघातांचे घाव सोसत होती. एक कोटींची भव्य फौज घेऊन आलेली दक्खनी आदिलशाही हिंदवी स्वराज्याला निस्तनाभूत करावी म्हणून डाव खेळत होती; पण मराठांच्या रक्तात भिनलेल्या सामर्थ्यापुढे आदिलशाही बळ काही टिकत नव्हते, ते स्वतःच नामशेष होत होते. तोरणा, सिंधुदुर्ग, रायगड आणि प्रतापगडावर मराठ्यांचे शेंदरी भगवे फडकू लागले; तसे आदिलशाहिच्या हिरवळ डोळ्यांत लाल रंग झुळू लागला. आदिलशाही हुकूमत, बिजापूरची शहाजादी ‘बडीबेगमसाहिबा’ क्रोधाने लालभडक झाली होती. राजदरबारात पन्नास-साठ सरदारांची मान खाली झालेली बघून आदिलशाही शरमेनं व्यापून झुकत होती. सगळ्या राजसरदारांचे भयनिमूत झालेले डोळे बडीबेगमला आणखीच संतप्त करीत होते. एकाही सैनिकाचे बळ तेवढे शिल्लक नसावे जे मान वर उचलण्याचे सामर्थ्य करेल. बिजापूरच्या राजदरबारात त्यावेळी नीरव शांतता गुंजत होती. हिरे-

मोत्यांनी जडलेल्या दक्खनी भिंती देखील बाहेरून गतगतीने वाहणाऱ्या वायूचे मदगुज सर्वांना स्पष्टपणे ऐकवत होत्या. त्या आवाजात सोनेरी झुंबराचा देखील मदगुज स्पष्ट होता. काळ कसे सुन्न झाल्यासारखे वाटत होते!

मान झुकवलेल्या सरदारांपुढे बडीबेगम राजदरबाराच्या राजसिंहासनावर पांढऱ्या तलम वस्त्राच्या पळद्यामागे हुकुमत विराजित, समोरच्या सरदारांना कटाक्षबद्ध नायानाने बघत, कसल्यातरी गूढ चिंतनात रमली होती. तिच्या मुखावरचे तेज आणखीनच कोतरे झाले. ते भाव एक नव्हते, पण अस्पष्ट असूनही जाणते होते. क्रोध, चिंता, भीती, पराभव, आत्मघात, ठेस, दुःख, शल्य, आणि राजजबाबदारीची जाणीव, हे सर्व भाव त्या स्त्रीमध्ये प्रकाशित होते. पण आखिर ते सर्व भाव एक निमूत झाले.., तुफानी बोलीत!

“ लानत है तुम सबपर! लानत! अपने आपको अदिलशाही के सरदार कहते हो, अपने सिर पर इमान की पगड़ी पहनते हो, और आज उसी इज़्ज़त की पगड़ी को नीचे झुकाकर सरेआम नीलाम करते हो कमबख़्त!! लानत है तुम सबपर! वो शिवा जब बिल से बाहर निकला तो कितनो के साथ? कितनी फ़ौज थी उसके पास?”

बडीबेगमच्या प्रश्नाला पृत्युत्तर मिळाले नाही. ते आणखी क्रोधीत होऊन विचारू लागली, “कमबख़्तो! दीवारों से नही तुमसे पूछ रही हूँ!!!”

“छह हज़ार बेगमसरकार!” सर्व सरदारांचा एक आवाज उत्तर म्हणून प्रत्युत्तर झाला. मग त्याच बेभान तुफानी स्वरात बेगमने प्रश्न केले, “और हमारी फ़ौज कितनी थी?”

बेगमला पुन्हा शांतता ऐकू आली, ती आणखी क्रोधीत झाली.

“मुर्दे बन गए क्या सब के सब! मैने पूछा हमारी फ़ौज कितनी थी?”

“चालीस हज़ार बेगमसरकार!”

“चालीसहज़ार सैनिक, दस हज़ार गज़दल, छहसो तोपे, और चारसो घुड़दल! साठहज़ार की मुगली फ़ौज, और सिर्फ़ छह हज़ार मराठे! फिर भी ये हार क्यों? क्या आदिलशाही खून में इतना तहज़ाब नही बचा जो दुश्मन का सिर निचोच कर जहान-ए-हुकूमत कर सके? या फिर तुम सल्तनत की तौहीन करना सीख गए? “

“नही बेगम सरकार!!”

“तो फिर ये सिर आज शर्मसार क्यों? फ़ते आदिलशाही हुकूमत की सरज़मीं पर दुश्मन का पगदा क्यों?” या प्रश्नाचे उत्तर मात्र कोणत्याच मुगली सरदाराकडे नव्हते. त्यांची माने वर होऊन पुन्हा खाली झुकती झाली, हे बघून बेगमाचा क्रोध अस्मानावर पोहोचला. ते बेभान होऊन तरळली, कोसळत्या विजेप्रमाणे! - “क्या इस सरदारो में कोई मर्द नही बचा जो शिवा को ज़िंदा या मुर्दा पकड़ सके? क्या यहाँ ऐसा कोई है जो इस मुईम को फ़ते करने का जज़्बा रखता है? हमे शिवा चाहिए!!!!! ज़िंदा…, या मुर्दा!!!!!!”

कोणाचीच मान वर झाली नाही. त्या खामोशीत साऱ्याच सल्तनतेला अपमानजनक वाटत होतं. बेगम पुन्हा उफाळल्या, “लानत है तुम सब पर!! अफ़सोस के साथ आज मुझे कहना पड़ रहा है की हमारी सल्तनत में ऐसा कोई फ़ौलादी मर्द नही जो शिवा को पकड़ सके! छी!”

“रुकिये बेगमसरकार!!!!!” अचानक दरबाराची ती शांतता एका जाड़ मर्दानी आवाज़ाने भंग पावली!

“कौन है वो?” बेगमने विचारलं; तसा मागून धिप्पाड़ देहाचा, अंगबलशाली, फ़ौलादी छातीचा ऊँचपुरा मर्द समोर चालता झाला! तो होता अफ़ज़लखान!

“ग़ुस्ताख़ि माफ़ बेगमसरकार, लेकिन आप ये कैसे कह गयी की हमारे सरदार नामर्द है!” तीक्ष्ण स्वरात आणि अतिआत्मविश्वासात अफ़ज़लखान बोलत होता, “ये नाजायज़ लफ़्ज़ उन कम्बख़्त मराठो के लिए है, हम तेज़ाबो की रूह में इसे पनाह क्यों? “

“बातों में तेज़ और जिगर में फ़ौलादी जज़्बा होने में ज़मीं-आसमाँ का फ़रक होता है!”

“ ज़मीं पर हुकूमत, और आसमाँ में आदिलशाही परचम, कायनात वफ़ा है, पूछो उससे, फ़ौलादी कहा पैदा होते है!”

अफजलखानाच्या या उत्तराला साऱ्या दरबारने जोरदार तवज्जो दिला आणि “वल्लाह! वल्लाह!” म्हणत जोश पैदा केले.

“हम लाएँगे शिवा को, हम!!! ज़िंदा…, या मुर्दा!” अशी जोरदार गर्जना करत अफजलखानाने साऱ्या दरबारी शर्यतेचा विडा उचलला. त्याचे ते साहस बघून बेगम फार खुश झाल्या.

“वजीर! अफ़ज़लखान को साठ हज़ार की फ़ौज दी जाए. हथियार, भाले, तोप-बंदूको को मुईम-ए-ताबूत करो. मुईम की तैयारी करो. बहुत जल्द उस शिवा की गर्दन हमारे हाथ में चाहिए!!!!”

“हुकूमत-ए-आदिलशाह…… *ज़िंदाबाद!!!!!”* आणि या जल्लोषासह बिजापुरात एका अनामिक समाधानाची कारंजी फुटून गेली!!

अफजलखान जसा शरीराने धिप्पाड होता, तास बुद्धीने देखील तरबेज होता. राजनीतीचे डावपेच त्याला चोहपैज कळत असे. बुद्धी आणि बळ हे दोन्ही गुणं जगातील फार कमी लोकांना प्राप्त झालेल्या असतात. अश्या लोकांना इतिहास नेहमी अचूकपणे आठवण ठेवत असतो. हे पात्र देखील असेच काही…..!

मोहिमेची सुरुवात झाली. बिजापूरच्या खुंज म्यानातून धारदार तलवारी, भाले, खुम्पे, गदा, चक्र, आणि हाथीयारांची चैनी बाहेर पडल्या, नुकीऱ्या कोटऱ्यांचे भट्टीखाणे उघडते झाले, चिलखत, शिरस्त्राणि, लोहत्राणा आज अंगरखे झाले होते, फौजेची ताबूत झाली-साठ हजारांची फौज त्यात चाळीसहजार घुडदल, वीसहजार पैदल सैनिक, दोन हजार हत्ती, आणि पाचशे तोपांची शामिली निमूत झाली होती. शत्रुनी शमशीरी नांग्या केल्या, फौजेच्या रक्तात आभाळी कंप रुजः जाहले, मद आणि जल्लोषाचे भान घेऊन दक्खनी फौज मारण्यास आणि मरण्यास भानावून गेली, मोहिमेचा प्रारंभ असाच असावा लागतो!

ते अष्टमीची रात्र होती. अफजलखान त्याच्या शामियानात आपल्या दोन खास व्यक्तींसोबत मुहिमेची चर्चा करत बसला होता. त्या दोन मंडळीत अफजलखानाचा अंगरक्षक सय्यद बंड, आणि खाजगी वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी अशी दोन व्यक्ती, आसनावर बसून विचारविनिमय करत होते. अफजलखानाची चर्या शांत दिसत होती…,चेहऱ्यावर सतेज आत्मविश्वास झळत होता, जे प्रत्येक सरदाराचे उभरी गुण असते. पण किती ही आत्मविश्वास असला तरी युद्धाचे परिणाम ठराविक नसते. जीवन आणि मृत्यूची किंमत युद्धा करत नसतो. आणि ज्याने परिणामाच्या आधीच शत्रूला आपल्याहून कमजोर समजले, त्याने रणांगणाच्या आधीच हार स्वीकार केली!

सय्यद आणि कृष्णाजी भास्कर अफजलखानाच्या त्या शांत देहाला निखरीत होते. काही काळ अशीच नीरव शांतता राहिली, आणि मग कृष्णाजी भास्कराने त्या शांततेला भंग केले.

“हुजूर, आपण कसल्या विचारात गुंतला आहात?”, कृष्णाजीने विचारलं.

“सोच रहा हूँ कृसनाजी, के शिवा को किस तरीक़े से निस्तीनाबूत करके सुल्तान के ख़िदमतगार बने.”

“ग़ुस्ताख़ि माफ़ हुज़ूर लेकिन शिवा को पकड़ना उतना आसान नही होगा,” मध्येच सय्यब उद्गारला, “पश्चिमी तट पर चारो तरफ़ शिवा के भगवे परचमो का साया आसमाँन में मंडरा रहा है। मराठी सेना और हिंदवी स्वराज का ताबा दिन भर दिन मजबूत होता जा रहा है!”

“उसी हिंदवी स्वराज को चूर चूर कर मसल देंगे हम!! बस एक बार शिवा हमारे क़ब्ज़े में आ जाए!”

“ते एवढं सोपं नाहीय हुजूर!,” कृष्णाजी म्हणाला , “मराठ्यांचा सिंह आहे त्यो! अन त्याला कब्जेत घेणं सोपं नाही. सरकारने अतिआत्मविश्वास न ठेवलेलंच बरं!”

“हौसलाफ़जायी तुम क्या जानो बाहमण, के उसका एक अल्फ़ाज़ भी रगो में कितना जान भर देता है! हकीम! हमारे जासूसो से क्या इख़्तबर मिली है? इस वक्त शिवा कहा है?”

“हुज़ूर! अहेमदनगर से शिवा ने हाली में विजयदुर्ग केले पर फ़ते पायी, वो वही कुछ साथियों के साथ है ऐसा सुनने में आया है।”

“ह्म…तो शिवा विजयदुर्ग में है।उसके साथ कितनी फ़ौज है?”

“अन्दाज़ा नही, माफ़ी हुज़ूर!” सय्यद ने उत्तर दिले। त्या उत्तरावर अफजलखानाने एक कटाक्षबद्ध हास्य दिले आणि ““दिशा जानते हो लेकिन फ़ौज का अन्दाज़ा नही। हम बताते है…,” अफ़ज़लखान बोलू लगला- “वो क़रीब क़रीब पाँच हज़ार मराठे है जो इस वक्त शिवा के पास होंगे। और शिवा आज नही तो कल राजगड को जल्द से जल्द रवाना होगा। एक बार राजगड के दरवाजे उसके लिए खुल गए तो वहा से उसे पकड़ना बहुत मुश्किल होगा।”

“तो क्या अब सीधे विजयदुर्ग पर हमला बोल दे?” सय्यद मध्येच बोलला.

“ नादानी!” असे म्हणत अफजलखानाने उपहास्य उत्तर दिले, “सय्यदमियाँ, इसे नादानी कहे या फिर आपकी कम अक़्ल की फ़रबीज़ी!” [फ़रबीज़ी- फ़र्ज़ी सोच]

"माफ़ी हुज़ूर!". म्हणत सय्यद चाचपला. त्याला त्याच्या उत्तराची लज्जा आली. मग कृष्णाजीने विचारले, "मोहीमेची सुरुवात कुठून करायची हुजूर?"

अफजलखान बोलू लागला, "हमारा शामियाना इस वक्त बिजापूर में है। उत्तर-पश्चिमी ज़मीं से पश्चिमी ज़मीं के मूलूखो से होते हुए मराठो के एक एक गाँवों को बर्बाद करके हम यहाँ, इस तुलजापुर से होते हुए सह्याद्रितल तक अपनी फ़ौज और कर गिरफ़्त करते हुए आगे राजगड की ओर बढ़ेंगे, जिसमें वाई हमारा आख़री अधीन मुलूख होगा।मुगली फौज तयार करो. दोन दिन बाद हम बिजापूर से निकलेंगे!"

तेवढ्यात शामियानाच्या बाहेर सेवक आला आणि "क़ाज़ी आ गया है हुज़ूर, कहे तो अंदर भेजने का फ़रमान करे।"

"ह्म, भेज दो उसे अंदर!" म्हणून अफजलखानाने हुक्म दिले. थोड्याच वेळात काजी शामियानाच्या आत आला. त्याला 'शिवमूर्त' काढण्यासाठी बोलावून घेतले होते. त्याने आपल्या कार्याला सुरुवात केली. हातात माळी आणि डोळ्यांपुढे कसलेतरी नक्षत्र जुळवून तो मोहिमेचा निकाल बघत होता. कृष्णाजी आणि सय्यद अफजलखानासह त्याच्याकडे बघत राहिले. काही काळ असाच वाहिला, मग अचानक काजीच्या गूढव्याप्त सौम मुद्रेवर चिंतेची झुळूक दाटून आली! त्याचे हाथ थरथरत होते, गळा दाटून आला, क्षणार्धातच चंदनाकुलीत कपाळ घामाने ओझर झाले! काहीतरी अपशकुन होणार आहे, मोहिमेचा निकाल मुगलांच्या छातीवर मृत्यू म्हणून खोराटला जाणार होता!

"क्या हुआ?" अफजलखानाने विचारलं.

भयकंपित स्वरात काजी बोलू लागला, - "सरकार, मोहिमेचा निकाल अपेक्षाहून विरुद्ध असणार असे हे नक्षत्र सांगत आहे. कदाचित आपला पराभव निश्चित आहे हुजूर! आपण मोहीम मागे घ्यावी! नाहीतर….."

"कम्बख्त!! 'तेरी ये मजाल!!!". अफजलखान खवळलेल्या वाघाप्रमाणे उठून किंकाळला. तबकावर ठेवलेल्या छुरीत त्याची बोटं रंध्र झाली, आणि वायूच्या वेगानं ती छुरी त्या काजीच्या गळयातून आरपार झाली! त्याच क्षणी त्याने प्राण गमावले…!

ते आत्मघात होते, काजीचे नव्हे, अफजलखानाचे! ते अहंकार चूर चूर झाले जे जगाला नि:पात करण्याचे अतिसामर्थ्य दाखवत होते. माणूस खवळतो, हा तर अहंकारीचा स्वभाव असतो, जेव्हा त्याचे अहं ठेस खाते, तेव्हा त्याचे तेच मृतअहं क्रुद्ध-बेशुद्ध क्रोधात रूपांतरातीत होऊन खवळतो! बेशुद्ध भान त्याच्या कारणीभूताला प्राणाची भिक्षा का देणार…, तो तर उलट त्याचे प्राण घेणार, खवळलेल्या वाघाप्रमाणे!!

यापूर्वीही त्याचे बोल कधीही खोटे नव्हते सिद्ध झाले हे कदाचित अफजलखानाला माहित होते. म्हणून तो सावध झाला! त्याचे अहं क्षणार्धात चकणाचुर झाले, संकोच, भीती, नि आता भवितव्य नक्कीच काहीतरी भयाण असणार असे त्याला वाटू लागले! त्याची मनःस्थिती संतापली होती, अश्या वेळेस त्याला काही बोलणे अपरिहार्य योग्य नव्हते, तरीही सय्यदने आपले प्रश्न निसंकोच प्रकट केले, "अब क्या करे हुजूर? लागता क़िस्मत हमारे साथ नही."

"क़िस्मत कमबख़्त बेमुरव्वत होती है सय्यद! मुईम होगी! ज़रूर होगी! फ़ौज में ऐलान कर दो! दो दिन बाद हम तुलजापुर को रवाना होंगे!! जाओ कर दो ऐलान!!"

“जो हुक्म सरदार!” म्हणून सय्यद शामियानाच्या बाहेर निघून गेला!

अफजलखानाने मद्याचा प्याला उचलला नि तो आपल्या जनानखान्यात जायला रवाना झाला! पासष्ठ राण्यांमधील त्याची सर्वात आवडती बेगम ज़ुमियाबेगम च्या महालात त्याने प्रवेश केला. डोळ्यात प्रेम उतू जात होते. तेच प्रेम दोन क्षणानंतर मुकम्मल झाले, जेव्हा दोन्ही देह एक झाले! पण त्यादिवशी, त्यावेळी अफजलखानाची चर्या सौम नव्हती हे ज़ुमियाबेगमच्या ध्यानी आलं!

“आप…, आज डरे हुए लगते है शौहर! आह्ह!!! आह्ह!!!!!!!!”

“आज हमारी सबसे प्यारी चीज़ खोने जा रही है बेगम!”

“ह्हह!! ह्ह!! वो कौनसी?”

“आप!!!” असे बोलून त्याने फळावरची कट्यार आपल्या हाती घेतली, आणि देह वेगळे केले. बेगम मात्र फार घाबरून गेली होती.., ते चाचपली.., आणि दिवाणावरून उठली, तसे अफजलखानाने तिला आपल्या बाहुपाशात घट्ट आलिंगन दिले आणि ते दोन देह पुन्हा दिवाणावर सामावले! अफजलखान बेगमच्या देहावर होता, त्याने गूढ चुंबन दिले.., आणि मग त्याच स्थितीत, त्याच मुद्रेत त्याच्या हातातल्या कट्यारीने आपल्या बेगमचा नाजूक गळा चिरून टाकला….!

“मुझे माफ करना बेगम!” - असे शब्द हळूच आसवांच्या रूपात जनानखानाच्या भिंतींना ऐकू गेले !!

ती रात्र इतिहासात रक्ताच्या शाईने लिहिली गेली होती…., कारण तदनंतर जे घडले, ते खरंच कल्पनाहून दूर, फार भयाण होते. अफजलखानाने आपल्या

खासगीच्या फौजेला आदेश दिला, “मेरा जनानखाना उठाकर खूनबावडी की ओर लेकर आओ!”

ती मध्यरात्र होती. आभाळात तसा तो चंद्र आज नव्हता खिलला, सर्वत्र गाळ अंधुक धुकं वलयं घेत होती. अफजलखानाच्या सर्व राण्या खूनबावडी जवळ आणल्या गेल्या. त्यांना कदाचित कल्पना नव्हती, की काहीच क्षणात त्यांची बेरेहम हत्या होणार आहे! ‘खूनबावड़ी!’ एक विहीर होती जिथे गद्दारांना क्रूर शिक्षा देण्यात येई. ते विहीर दोनशे मील जमिनीच्या आत खोरली गेली होती, त्यात जुलमीना जिंदा फेकून देत होते, अगदी निर्दयपणे!

आणि घडले ते तसेच!! एक एक राणी निर्दयपणे त्यात फेकून दिली गेली! पण त्या आधी त्यांची गळे कापून दिली गेली! असं का करण्यात आलं याचे रहस्य आजही फक्त अफजलखानाच्या हृदयात दडलं आहे!! इतिहास सांगतो, त्यांच्या हत्यानंतर त्यांची कब्र बनवण्यात आली जे बिजापुराहून काही अंतरावर स्थित आहे ज्याला ‘साठ कब्र’ म्हणून नाव दिले गेले!



[साठ कब्र, बिजापूर. जिथे अफजलखानाच्या 65 बायकांची कब्र तयार केली होती. सन. 1659]

# मोहीम

खानाचे दाळगज हत्ती उठले! मावळत्या सूर्यासह जसे आकाशाने काळे रंग घेरले, तसे जमिनीवरच्या आदिलशाही फौजेनं आकाशाला त्याचेच भयाण काळेकुट्ट रूप प्रत्युत्तर म्हणून आणखीनच भयावह उत्तरात हातात हतियारे, अंगात चिलखत, लोहत्रणा घालून दिले! मद्यकुंड एक एक सैनिकाच्या देहात शिरले! अंगात शक्तीने संचार केला! मुगली आत्मविश्वास आणि जोश आभाळापर्यंत गरजला! 'अल्लाह हू अकबर! अल्लाह हू अकबर!"

साठ हजारांची फौज होती. दोनशे तोपे, दहा हजार गजाती, वीस हजार घुडसवार सैनिक आणि तीस हजार पैदल सैनिकदल तुळजापूरच्या दिशेने धाव घेत होता. चार तासाचा प्रवास झाला, नि फौज विश्रांतीसाठी थांबली. दोन तास विश्रांती झाली. सूर्य उगवला, आणि फौज पुन्हा आपल्या रुळाला लागली. प्रवास चालत होता. इथून तुळजापूर आणखी एक दिवसाच्या अंतरावर होते. फौज होत्रीहून नंदगिरी, मग तिथून बल्लोळी, सोरेगावहून सोलापूरमार्गात तुळजापूर पोहोचली. मराठ्यांच्या पवित्र जमिनीवर शत्रुचे पायठसे उमटले गेले! कहर सुरु झाला! तुळजापूरच्या मंदिरात आईभवानी स्थित होती. मराठ्यांचे

पवित्र कुंकुमकरंड, जगण्याचे आधार, हिंदूंचे कुलदैवत त्या तुळजापूरच्या किल्ल्यात स्थापित होत्या!

“हल्ला बोलो!!!! जला दो!! राख कर दो सब कुछ!!! लूटो, सब ख़ज़ाना लूटो!! ये सब मक्कार है, क़त्ल करो इनका! मार डालो इन्हें!!!!”

असे बोलून खान एखाद्या राक्षसासारखा हसत होता! अचानक त्याचे लक्ष मंदिरात लपलेल्या एका ब्राह्मणाकडे गेलं! त्याला बघताच खानाला राग आला नि तो आपले पावलं दरबाराच्या दिशेने वळवू लागला! खान मंदिरात शिरला. त्याच्या हातात शमशीर होती. तो बेफिकीरपणे हसत होता. पण ब्राह्मणाचा जीव कापत होता. खान हसतच त्याच्याजवळ आला आणि आपली तलवार शिरस्त त्याच्या गळयावर ठेवली- “क्यू कम्बख्त! डर क्यों रहे हो? पैगंबर जाओगे, हमारे हाथ जो मर रहे हो!! हा हाँ हाँ!!!! कहो, अपनी आख़िरी इब्तिदा.. हम ज़रूर पूरी करेंगे!”

“ब्राह्मण थरथर कापत्या स्वरात उद्गारला, “सरकार!!! आई तुळजाभवानीचं पवित्र मंदिर हाय! तिथे रगत सांडू नका देऊ! म्या पाया पडतो!!”

“हम्म… तो है बात है!!” असे बोलून खान जोर जोरात हसू लागला, “काट डालेंगे इस भवानी को!!” असे बोलून खानाने आई भवानीची मूर्ती आपल्या पाशात धरली! नि क्षणार्धात जमिनीवर आपटून त्याचे तुकडे तुकडे करून दिले! हे सर्व त्या ब्राह्मणाने आपल्या प्रत्यक्ष डोळयांनी पहिले. मग खान पुन्हा हसू लागला नि बोलला, “क्यू बाहमण! और कोई इच्छा?”

“आई, आई, आई!” असे म्हणत तो भवानीच्या मूर्तीला स्पर्श करायला जमिनीवरून रुळत होता हे खानाने पहिले. ब्राह्मणाचे उजवे हाथ त्या चूर चूर

झालेल्या मूर्तीला स्पर्श झाले, हे बघून हसणारा खान अचानक रौद्रवित झाला! ‘“तेरी ये मजाल!!!!! बताऊँ तेरी करामत!!!!!” ब्राह्मणाला ओढून मंदिराच्या बाहेर आणलं. तिकडे एक जातं ठेवलं होतं जे खानाच्या दृष्टीस आलं. खवळलेल्या राक्षसाने आई भवानीच्या मंदिरात भवानीच्या मूर्तीला स्पर्श झालेल्या त्या हाताला अगदी निर्दयपणे त्या जातात पिसून काढले! वैरी वैराचे प्राण घेतो, अन राक्षस….?

मोर्चा पुढं चालला! तुळजापूरहून आता तो पंढरपूरच्या दिशेने गतिशील झाला.खान आणि त्याची फौज साक्षात वैकुंठाला पोहोचले! किती अजब!! राक्षसांनाही वैकुंठात स्थान मिळतो!! खानाची फौज जेव्हा पोहोचली तेव्हा पंढरपुरी विठ्ठलाचे भजननाद सुरु होते,

‘‘माँझे माहेर पंढरी..

जाहले जीव आतुरी

दिवस रात्र रूप तुझे ओवळी

कशी लागली रं तुझी जीवरी!!”

विठ्ठलाची भक्ती पाहून खानाला चैन पडले नाही.त्याचे क्रोध उफाळले! नि मग तेच घडले! साध्य भोळया लोकांची क्रूरतेणे हत्या झाली. पंढरपुरी गायी कापण्यात आल्या! भल्यारात्री लोकांची घरं त्या खानाने पेटून काढले! एक एक सैनिक मराठी स्त्रियांवर तुटून पडले! त्यांची अब्रू सारेआम उघडते झाले! नि अश्याप्रकारे शत्रुने पुन्हा एकदा आपला वीर पराक्रम गाजवला!!

सुख चैन लुटून, बलात्कारं करून फौज मोठा महादेव, ज्याला शिकार सिंहापुर अशी ओळख होती, तेथे खानाची फौज घुसली. सोमवारचा दिवस होता. सिंहापुरी महादेवाचे अभिषेक चालत होते. तेही मात्र त्या जुलम्याला बघावले नाही! राक्षसं पुन्हा खवळले! पुन्हा तोच कैतुर वर्तन! पुन्हा तोच जुलूम! पुन्हा तोच अत्याचार!! सारं काही भ्रष्ट करून गेला तो खान!

फौज समोर वाढत होती. आता ते रहिमतपूरला येऊन पोहोचली होती. हा किल्ला देखील खानाने आदिल हुकूमतच्या नावी केला. खजिना लुटून, हत्या करून फौज वाईच्या दिशेने निघाली! त्या रात्री जेव्हा फौज तंबू उभारून विश्रांती घेत होती तेव्हाच एक जासूसने खानाला खबर केली- राजे राजगडावर आहे.

खानाचा अंदाजा सटीक निघाला होता! सेनेच्या सरसेनापतीने- सैफखानने अफजलखानाला विचारलं, “अब आगे की मोईम किस ओर बढ़ाए हुज़ूर? आगे वाई है, जहा से राजगड कुछ ही मिलो दूर है। शिवा भी वही पर है। मराठो की फ़ौज बेशक वहा मजबूत होगी।हम सीधे जंग नही कर पाएँगे हुज़ूर!”

“जंग किसे करनी है सैफ़ख़ान?” खानाने उत्तर दिले, “ये दिमाग़ी जंग है।ख़ौफ़ दिखाकर दुश्मन को पकड़ना है, तलवारों से नही।”

“मतलब?”

“बड़ीबेगम को फ़रमान भेजो- हमे कुछ और सैनिक भेज दिए जाए।ये खबर मराठों को लगते ही शिवा हलबला उठेगा। बड़ी फ़ौज लेकर हम वाई को अपनी गिरफ़्त में करेंगे और अपना डेरा लगाएँगे।जिससे मराठों में और डर फैल जाएगा। शिवा को लगेगा की अब हमारी फ़ौज कभी भी राजगड पर हमला बोल देगी, जिससे वो तुरंत राजगड को छोड़ देगा और कोई और क़िले में जा बैठेगा।”

“लेकिन, वो ऐसा क्यों करेगा?”

“क्योंकि वो जानता है…, हम ‘उसे’ क़ैद करना चाहते.., जंग के इरादे से नही।”

“तो फिर हम राजगड भी जीत जाएँगे?”

“नही! हम राजगड पर हमला नही बोल सकते! हमे शिवा चाहिए,शिवा! राजगड क़िला मजबूत है, बेशक हम वो जीत तो जाएँगे लेकिन उसे फ़ते करने में बहुत वक्त लग जाएगा। और हमारे सैनिक भी तो मारे जाएँगे! इतने में शिवा कोई और चाल भी चल सकता है! फ़ौज मँगवाओ! सेना बढ़ाओ! जल्द ही यहाँ से वाई के लिए हमे रवाना होना है!”

बाहेरून नमाजाचे बोल ऐकू आले-

“बिस्मिल्ला हीररहमा निररहीम…!!!!”

वाढती सेने घेऊन खान वाईला आला. भल्या मोठ्या ताकदीनं त्याने वाईचेही तसेच हाल केले! मोठ्या देहाचा आणि मोठ्या बुद्धीचा असलेला अफजलखान आता वाट बघत होता तो मराठ्यांच्या शिकस्त फर्मानाची!

# राजगड

राजांच्या कानी खबर लागली होती- अफजलखान भव्य फौजेसह वाईला तैनात आहे. कुठल्याही क्षणी तो राजगडावर चढाई करू शकतो. मराठ्यांच्या नशिबी हे एक संकट आलं. बाळराजे जन्मून जास्त वेळ काही गेला नव्हता. अवघे एक वर्षही जायचे होते, तश्या सईबाई बाळंतव्याधीच्या झरोक्यात आल्या! एकीकडे संकटात आलेलं राज्य, दुसरीकडे हृदयात साचलेलं नातं! काय करावे काही कळेना.

आऊसाहेब आणि राजे खासगीच्या दारुणमहालात होते. चिंतेने राजे येरझरा घालीत होते. संवाद मौन चालला होता. चिंतनाचे गोळे सतत डोक्यात गिरक्या घालीत होते. मग आऊसाहेब बोलल्या,

“शिवबा, आपल्या डोक्यात कसली हळवळ चालली आहे हे आम्हास ठाऊक आहे. जरा शांत डोक्याने विचार करा.”

“तुळजापुरी आमच्या आईभवानीच्या मुर्त्या फोडून आपल्या माणसांची निर्दयपणे कत्तल केल्या गेल्या. पंढरपुरात गायी कापल्या गेल्या, बलात्कारं केली गेली, अब्रू लुटल्या गेल्या.. आणि आम्ही…, आम्ही काय केलं आऊसाहेब?” राजे उत्तरिले, “आणि आज तो अफजलखान आमच्या राजगडाच्या भिंतीआळ येऊन जिवंत कसा राहिला?”

“शांत व्हा राजे…, अश्या भेकाळ भित्र्या शत्रूसाठी आपले क्रोध व्यर्थ नका करू.”

“आउसासेब! तुम्हीच आम्हाला बोलला होतात, शत्रूला कधीही आपल्याहून कमजोर समजू नये, नि आता आपणच त्याला…”

“डोळयांसमक्ष दिसणारं वर्तन शब्दाआड सहज पळून जातं शिवबा. शत्रू आपल्या डोळयापुढं आहे, भव्य फौज घेऊन बसला आहे.., हाथियारं तोपं घेऊन आहे. पण त्या शत्रूत बळ मात्रं काहीच नाही.”

“मतलब?”

“तो राजगडावर हल्ला नाही बोलणार आम्ही हे जाणतो!”

“का?” राजे विचारते झाले.

“कारण शत्रूला आपण हवे आहात!”

“आऊसाहेब, हे आम्ही जाणतो. पण खान राजगडावर चढणार नाही याची पूर्ण खात्री आपण कशी देऊ शकता?”

“कारण राजगड जिंकणे तेवढे सोपे नाही हे खानाला ठाऊक आहे. तो वाट बघतोय ते फर्मानाची! तुमच्याशी गाठ घेण्याची! जर असे नसते आणि त्याला

युद्धानेच तुमचा पराभव करायचा असता तर विजयदुर्ग मार्गेच शत्रूने चोहबाजू आपल्याला गिरफ्त करून शिकस्त केले असते. तेव्हा शत्रूला आपला पराभव करणे जास्त मुश्किल नव्हते. तो उलट बुद्धीचा शत्रू आहे….तो जाणतो, शत्रू हा फक्त तलवारीनेच नाही हरत, पहिले वार भीतीचे असते, ते जर आपल्या शत्रूला जाणवले, म्हणजे आपले राजनीतीचे पहिले डाव सफल झाले!"

"होय आऊसाहेब, हा सर्व खेळ आम्हास कळले आहे. आता आमचा डाव देखील तोच असणार… पण शत्रूहून अगदी उलट!"

"काय असणार शिवबा?"

"आऊसाहेब, आम्ही उद्याच आपल्या माणसांसह प्रतापगडावर जातो. तेथून खानाला फर्मान पाठवतो. आम्हास खात्री आहे, करारीचा जवाब तो नकारणार नाही!"

"संधीचे ठिकाण प्रतापगडच का निवडले शिवबा?"

"कारण साताऱ्यात आपले स्वराज्य विस्तार आहे आऊसाहेब. त्या गडाच्या छावणीत खान नक्की येणार! आमची खानाशी गाठ पडेल, तेव्हा शत्रूने सापाचा डावपेच लावलाच तर त्यास प्रत्युत्तर म्हणून प्रतापगडासारखे किल्ले आमच्या रक्षणार्थ भलेभूत योजिले आहे!"

"यशवंत व्हा राजे! उद्याच्या तयारीला लागा! इथली चिंता करू नका. सुनबाईची आम्ही काळजी घेऊ! शंभूबाळ देखील आमच्या नजरेसमोरच असणार! जा, आता विश्रांती घ्या!"

आणि आऊसाहेबांना मुजरा करून राजे महालाच्या बाहेर चालते झाले!!

# प्रतापगड-

राजे प्रतापगडावर आले. त्यांच्यासह दहा हजारांची फौज आणि विश्वासू मंडळी सोबतीला होती. त्या मंडळीत संभाजी कावजी, जीवा महाल, नेताजी पालकर अशी खासगीची माणसं होती. किल्ले प्रतापगड! सह्याद्रीच्या तळाशी, साताऱ्यात विसावलेलं आभाळाच्या कुशीत माखलेलं उंच आणि भव्य असं डोंगर, जिथे मराठी मातीने त्याच्या तप्त हाताना अंगार देऊन डोंगराची छाती चिरून पाया रचलेला रुंद असा प्रतापगड! त्याला पूर्वी ढोरप्याचे डोंगर म्हणून प्रचिती होती. ते पूर्वी आदिलशाहीच्या जहागिरीत येत, चंद्रराव मोरे त्याचे किल्लेदार म्हणून होते. 1656 साली शिवाजी महाराजांनी ते जिंकून ढोरप्याचे डोंगर स्वराज्याच्या अधीन केले.

राजांनी प्रतापगडावर पाऊल ठेवले आणि ताबडतोप त्यांचे वकील गोपीनाथपंतांना अफजलखानाला भेटीचे फर्मान लिहा म्हणून आदेश दिले. राजे बोलत होते, नि पंत लिहीत होते…

*"हुजूर-ए-आला, हमारे चाहते काकाजान को इस शिवाजी का मुजरा!*

*हम जानते है काकाजान की आप मेरे फ़रमान का इंतज़ार कर रहे होगे।आपको काकाजान कहने का एक विशेष कारण है। हमारे पिता शहाजीराजे भोंसले अदिलशाही के सेवक है। और आपके मित्र भी। उस हिसाब से आप हमारे काकाजान हुए। ये करार आपसे संधी करने के लिए है। हम युद्ध की इच्छा नही रखते। क्यों की हम ये बेख़ूब जानते है के हम आपको नही जीत सकते। इसलिए ये संधी का फ़रमान आपको सीधे प्रतापगड़ से भेज रहे है। हम इस वक्त किल्ले प्रतापगडपर पर मौजूद है। अगर आप करार का मान रखते है तो वहा हमारी भेंट, हो सकती है।"*

अफजलखान त्याच्या शामियानात एका आसनावर दृढ होऊन बसला होता. तेवढ्यात सय्यद बंड त्याच्या शामियानात आला. खानाने विचारले, "काहो सय्यद, कोई नयी खबर?"

"नही हुज़ूर, लेकिन….."

"लेकिन क्या?"

“सात दिन गुजर गए, हमारी फ़ौज तब से इस वाई में भटक रही है। ये मूलूख भी अब निस्तनाभूत हो चुका है। फ़ौज चाहती है की मुईम को आगे बढ़ाया जाए।”

तेवढ्यात एक जासूस परवानगी घेऊन आत आला.

“मराठो से फ़रमान आया है हुज़ूर”

अफजलखानाने ते फर्मान वाचले. वाचून झाल्यावर वो खळखळून हसू लागला. “ये शिवा हमसे डरता है सय्यद!!!! ये तो बड़ा ही डरपोक निकला!!!!!”

सय्यदने विचारले, “करार का जवाब क्या देना है हुजूर?”

“कह दो शिवा से, हम उससे मिलने ज़रूर आएँगे।लेकिन उससे पहले…, एक राजनीति और…”

सय्यदने जासूसला चालतं केलं आणि मग खान बोलू लागला…

“प्रतापगल किला. वाई और इस किले के बीच हमारे कितने मुलूख़ कितने है?”

“हुज़ूर, भोर ज़िला जो इस रोहिड़खोर प्रांत में है, वहा अदिलशाही हुकूमत इन पंद्रह गाँवों से वतन लेती है। जिसमें से ये उत्रोली नामक गाव भी आदिलशाही जहागीर के अधीन है। लेकिन..”

“लेकिन क्या?”

“ये बारा मूलूख अब अदिलशाही को वतन नही देती. कुछ साल पहले शिवाजी ने रोहिड़ागड फ़ते किया था। तब से ये बारा मुलूख़ शिवाजी के अधीन है जिसमें उत्तरवाड़ी, बाजरे, बाज़ारवाड़ी सहित उत्रोली और बाक़ी मूलूख शिवाजी के वतनदीर है।”

“ह्म…,तो ये बात है। ये दग़ाबाज़ इतने साल आदिलशाही के सेवक रहे, और आज ग़द्दारी! वज़ीर!! पैमान लिखो! इन बारा मुलूख़ो को कहो कि शिवाजी का साथ अगर दिया तो अदिलशाही हुकूमत से अपना भरोसा ख़ो बैठोगे और आदिलशाही से दुश्मनी मोल लोगे! उन्हें कहो, हमारे शरण में आए, वरना अंजाम भारी होगा!!”

“जी हुज़ूर!!” म्हणून फर्मान जारी झाले नि रोहीडखोरांच्या बारा मुलूखात अर्ज झाले.

अफजलखानाचा वार सरळ आपल्या माणसांच्या ह्रदयात एखाद्या तीक्ष्ण बाणाप्रमाणे रुतून गेला. त्या बारा वतनदिरांमधून एक सर्प उठला- उत्रोळी गावाचा वतनदीर जो महाराजांच्या उपकाराणे ऐथवर सुखाने जगत होता- खंडोजी दरमोजी खोपडे. त्याची चर्चाही गावा गावांत फार प्रख्यात होती. 1637 पर्यंत उत्रोळी गावाचे देशमुख- गंगाजी नाईक होते. त्यानंतर त्या ठिकाणी केदारजी नरसोजी खोपडे. खंडोजी खोपडे हा त्यांचा चुलदबंधु. गावभर त्यांचा वाद फार प्रख्यात होता. खंडोजी दर वेळेस आपल्याच पायांवर कुर्हाड खुपसून घेई. एके दिवशी वाद आभाळाला पोहचला. रागाने वैतागून जाऊन केदारजीने खंडोजीचे तोंड खुपसून काडले नि त्याला गावातून बाहेर खालून दिले! पित्याची वडिलोपाजी जहागीर देखील आपल्या ताबूत करून घेतली! खंडोजी तदनंतर महाराजांच्या शरणी गेला. राजांच्या कृपेने त्याने ती जहागीर पुन्हा मिळवली.

महाराज त्याला कृपाळू होते कारण तेव्हा तो मुलूख आदिलशाहीच्या ताब्यात होता. तेव्हापासून खंडोजी महाराजांचा वतनदीर झाला होता.

पण आज या सर्पाने आपले रूप दाखवूनच दिले. अफजलखानाचा फर्मान मिळताच हरामखोर गद्दारीवर उतरला. तो थेट अफजलखानाच्या भेटीला रवाना झाला, राजांना ते बेखबर राहिले!

मग दोन दिवसांनी गुप्ताचाराने खंडोजीने दगाबाजी केली आहे असे महाराजांना सुचविले. त्यांच्या पायाखालून जमीन सरकून गेली! समोर गोपीनाथपंत उभे होते.

राजे बोलले, "ज्या माणसावर आम्ही एवढे उपकार केले, त्याची जहागीर परत मिळवून दिली, विश्वासात ठेऊन वतनदीर केले, आज तोच हरामखोर आमच्याशी गद्दारी करतोय!"

यावर गोपीनाथपंत काहीच बोलू शकले नाही.

राजे बोलले, "पंत, कधी कधी या जगात अश्या ही गोष्टी घडतात जे माणसाला माणुसकीच्या आणि विश्वासाच्या नात्याला खोटे साबित करतात. पत्र लिहा पंत! त्या अकरा मुलुखांना आमचे पत्र सांगा, 'जा, जाऊन अफजलखानाला मिळावे. आणि जर आम्ही हवे आहोत, तर इथे यावेत!"

"होय राजे! जशी आज्ञा!!

खानाचे उत्तर आले! "हमे मंजूर है" म्हणत खान उद्गारला होता! आता राहिलं ते बैठकीचे ठिकाण आणि नियमचर्चा. त्यासाठी जागा निवडण्यात

आली. महाराजांचे वकील गोपीनाथपंत आणि अफजलखानाचे वकील कृष्णाजी भास्कर यांची वाईला बैठक झाली. दोघांनी घटकाभर संवाद केला. शर्यती कुबूल झाल्या. तारीख ठरविण्यात आली! जागा ठरविण्यात आली! आता खान प्रतापगडावर येणार होता!

# “राजप्रतिपत्य”

पंचमीचा दिवस उगवला! अकस्मानावर सूर्य तळपत होता, पण त्याची उष्ण सूर्यकिरणे आभाळात तरंगणाऱ्या धुक्यांत मिसळून जाऊन धरतीवर येईनाशी झाली होती! कोवळ प्रकाश पसरला; तरी धुकं काळोखाची जाणीव करून देत होते. राजे शिवाजी प्रतापगडावर होते. दोन दिवसानंतर अफजलखानाशी भेट होती. शत्रूवर विश्वास ठेवणं म्हणजे स्वतःच्याच हाताने आपलं मृत्युपत्र लिहून घेणं!

राजे शिवाजी आणखी त्यांचे विश्वासू मंडळी प्रतापगडाच्या खासगीच्या महालात गुप्तचर्चा करत होते. राजे आसनावर बसले होते, पण त्यांची चर्या फार गंभीर दिसत होती. समोर नेताजी पालकर, संभाजी कावजी, गोपीनाथ पंत, जीव महाला आणि इतर खासगीची सात माणसं होती. राजे बोलत होते....,

“तो शत्रू आहे, बंधू नाहीय. तो ज्या इराद्याने आला तो ते नक्कीच करणार असे आम्हास पूर्णपणे ठाऊक आहे!”

“राजे!,” पंत बोलले, “आता आखणुक काय?”

“शर्यती जश्या ठरल्यात, तश्या आम्ही कोटीने पार पडणारच!” राजे बोलले.

“होय राजे, त्यास प्रश्नच न्हाय,” पालकर बोलले, “पण त्यो खान शर्यती पाख पडेलच हे कुठून म्हणायचं?”

“जर शत्रू गद्दारीवर उतरलाच तर मराठी रक्त ही मागे-पुढे बघणार नाय! आम्ही सावध असूच! तशी दक्षता घेऊच! फक्त आपला डाव एकदा शत्रूच्या गाड्यात अडकला की तो आणखी निर्भय होईल!”

“राजे?, शत्रू निर्भय होणार त्यात आपलं काय भलं?” पालकरांनी प्रश्न केला.

“निर्भय होणे हा केवळ एक भ्रम असतो नेतोजी! आणि आत्मघात करून घेण्याचा पहिला डाव सुद्धा! शत्रू आपल्याला भिते म्हणजेच तो आपल्या केसालाही धक्का नाही लावू शकत असे समजून तो आणखी निर्धास्त होतो! त्याच निर्धास्तपणेचा फायदा आपल्या उचलायचा आहे, अशी खोटी छवी अफजलखानाच्या मनात तयार करायची की आम्ही त्याला भितो! आणि आमच्यात तेवढी पावती नाही की त्यास हरवू. आम्ही आदिलशाहीच्या शरण यास तयार झालो असे खानाला वाटले पाहिजे!” राजे बोलत होते,

“पंत! तोम्ब्याच्या पातीएवढी पातळ, जे धारण करूनही घातल्यासारखी वाटणार नाही अशी चिलखत तयार करा! आमच्या अंगरखाखालचे ते पोशाख असणार!”

“होय राजे!”

“संभाजी! हाथियारखान्यातील पोलादं पेटवा! आणि आमच्या बोटांच्या मापाची अंगठ्याआळ फसून सहज न दिसणारं असं धारदार वाघनखांचं बांगळ बनवून घ्या!”

“व्हय राज!”

“नेतोजी! प्रतापगडाच्या मध्यस्थी भागावर किल्ल्याहून दूर खाईच्या टोकास एक शामियाना उभारा! गडाच्या खजीनखाण्यातून हिरे-माणकं घेऊन एक शहनशाही आसन उभारा! खानाच्या दृष्टीला भांबावून सोडणार अशी सोने-चांदीची पाती लावा! रत्नांनी शामियाना उजळून टाका!”

“जी राजं!”

“संभाजी! अंगरक्षक म्हणून तुम्ही आणि जीवा महाला आमच्या सोबत असणार! शर्यतीनुसार दहा हजारांचे सैन्य गडाच्या टोकाशी तैनात ठेवा! आपले चारशे मावळे गडाच्या गुप्त दगळीगुफेत लपून असणार. त्यांच्या इशारताची किमान आम्ही नेतोजी तुम्हाला सोपतो! शत्रूचा डावपेच उबळया हाताने उचपटून काढायचा! गडाच्या फारसबंदीवर मावळयांची जागा आम्ही स्वतः सुनिश्चित करू. खानाला फर्मान धाडा! आमच्या साऱ्या गोष्टी ध्यानी ठेवून आबासाहेबांचे नाव लिहून खानाला पत्र धाडा!”

राजे बोलत होते, सारे ध्यान ठेऊन ऐकत होते. वेळ नि:स्तब्ध वाहत होता....!!

खानाचा शामियाना ... अर्ध्याहून जास्त प्रवास झाला, आता प्रतापगड जास्त दूर नव्हते. 4 घटकांचे अवघे प्रवास शिल्लक होते. सह्याद्रीच्या अरण्यात खानाची सेना तंबू उभारून विश्राम घेत होती. खान आपल्या खासगीच्या अंगरक्षकांसोबत चर्चा करत होता. खानाचा सर्वात खासगी अंगरक्षक सय्यद बंड, सैफ खान,अफजलखानाचा पुत्र फजल खान आणि इतर तीन-चार माणसे होती. अवघी अर्धी रात्र होती, शामियानात पलित्याची एक मोम पेटत होती. बाहेर दहा हजार सैनिक गाढ झोपेत सामावून प्रवासाचा शीण दूर करत होते. एवढी जीवसंख्या असूनही अरण्य कसं शांत आणि सुन्नाट भासत होतं.....

शामियानाच्या आत अफजलखान एका आसनावर बसला होता. त्याची मुद्रा अगदी स्तब्ध होती. तो एकटक समोरच्या पलित्यावर जळणाऱ्या मोम जवळ बघत होता. समोर असलेली खासगी व्यक्ती त्याच्या चर्येवर लक्ष देत होते. नीरव शांतता होती... कुणीही काहीच बोलत नव्हतं! संवाद कदाचित मौन असावा, कुणास ठाऊक. मग ती शांतता सय्यदच्या प्रश्नाने भंग झाली.

“आगे क्या करना है हुज़ूर?” तो विचरता झाला.

खानाचे लक्ष काही गेले नाही. कदाचित त्याने ऐकलं होतं, तरीही तो काहीच बोलला नाही. हा बर्ताव पाहून मंडळी एक मेकांकडे प्रश्नार्थक डोळ्यांनी बघत राहिली. नंतर फजल बोलला, “अब्बाजान! क्या हुआ?”

तो काहीच नाही बोलला.

“अब्बाजान!!”

मग त्याची मग्न चर्या फजल खानाच्या स्पर्शाने भंग झाली.

“अब्बाजान, किस सोच में मसरूफ है आप? आगे क्या करना है…? सब बात करना चाहते है!”

“सूरज निकलते ही प्रतापगड को हम रवाना होंगे!”

“लेकिन फिर आगे…”

“ह्म!!!!!” खानाने मध्येच रोखुन, “फजल! शायराना हो जाये! महफिल सजाओ! जाओ!!!”

सर्वे गोंधळले होते, पण आदेश मिळताच नाईलाजाने प्रश्नार्थक मानाने शामियानाच्या बाहेर पडले! थोड्याच वेळात महफिल सजली! शायराना होत होता! गोंधळ होत होता! पुढे काय करायचं याचे रहस्य मात्र खानाच्याच मनात गिरका घालीत राहिले!!!

# कार्तिक महिना, तारिक 19, .[10 नोव्हेंबर, 1649]

उगवले,! सह्याद्रीचे सूर्य !!! भेटीचे दिवस आले! सारे बंदोबस्त झाले होते! राजांच्या आदेशानुसार शामियाना हिरे-मोत्यांनी सजवला होता. सैनिक त्यांच्या जागेवर चोखपणे तैनात केले होते! खानाची फौज तर एक दिवसा आळ भेटीच्या ठिकाणावर येऊन पोहोचली होती! तो शामियानात गेला. त्याच्यासोबत सय्यद बंड, कृष्णाजी भास्कर आणि गोपीनाथ पंत होते. खानाने आत प्रवेश करताच त्याच्या डोळयांना शामियानेची सजावट पाहून फार कुतूहल वाटले!

“वल्लाह! क्या खूब सजाया है इस शामियाने को हमारी ख़िदमत में!!”

“हुज़ूर…., ये सब आप ही का है!” गोपीनाथ पंत बोलले, “शिवाजी को तो डर था के कही आपकी मेहमाननवाज़ी में कुछ छूट न जाए…, इसलिए आपकी ख़िदमत मे ये छोटासी सजावट हमने की है!”

“ह्म!! हाँ हाँ!!!” खान हसून बोलला, “कह दो शिवाजी से… अपने काकाजान से अब ना डरे! अब वो तो हमारे चाहते हो गए है… और ये शामियाना देखकर और भी! जाओ कृष्णाजी, शिवाजी को बुलाके लाओ!”

“जी हुज़ूर!” म्हणत कृष्णाजी महाराजांकडे जायला निघाला.

राजे आणि इतर सर्व मंडळी प्रतापगडावर अफजलखानाच्या फर्मानाचीच वाट बघत होते. कृष्णाजी आले आणि

“अफजलखान आपल्या भेटीस शामियानात उपस्थित आहे. आपण चालावं!”

मग राजे विचारते झाले , “पंत! त्या शामियानात फक्त काकाजानच बसले आहेत न?”

“नाही! सय्यद बंड पण तिथे उपस्थित आहे!” पंतांनी उत्तर दिले.

“काय!” म्हणून भीतीचे भाव त्यांच्या मुखावर आणते झाले, आणि फार हळवळत्या स्वरात राजे बोलले, “काय! स.. सय्यद बंड पण तिथे आहे?”

“हो!”

“पंत! आम्ही सय्यद बंडाला खूप भितो. तो आम्हास तिथे नको! त्याला दूर पाठवावे, तरच आम्ही काकाजानची भेट घेऊ…, नाहीतर आम्ही परततोय!”

“नको! आपण थांबावे! आम्ही तुमची फर्मान हिजूरांना कळवतो!” असे म्हणत कृष्णाजी खानाजवळ आला आणि त्याने ही बातमी मोठ्या हास्यास्पद बोलणीने खानाला सांगितले!

“क्या!!! हा हा हा! अब वो शिवा हमारे सय्यद से भी डरता है?!”, “तो ठीक है! सय्यद! तुम बाहर जाओ और फ़ौज की बर्मश्त करो! कृष्णाजी…, जाओ अब कह दो शिवा से, उसकी मांग पूरी हो गयी है। अब बेफ़िकर होकर हमसे मिलने आए!!”

“जी!!”

महाराजांना बातमी मिळाली, त्यांना जे हवं ते घडत होतं. आता राजे आपल्या साथीदारांसोबत खानाशी भेट घ्यायला चालते झाले! काहीच वेळात शामियाना नजरेस येऊ लागला! वायूच्या मंद गतीने अखेरीस ते ठिकाण आले! निःशब्द झालं होतं सारं काही! आता जिभेवर शब्द येता कामा नय! हुकूमत त्याची, इशारतीची! मराठे शत्रूच्या घरात की शत्रू मराठ्यांच्या दारात...?, अंदाज लावणं मुश्किल होतं!

घोड्यावरून उतरून राजे पायउतार झाले, नि शामियानाच्या आत जायला चालते झाले! मनात आई जगदंबेचं स्वरूप होतं! जिभेवर आई जगदंबेचा उदो! शामियाना जवळ आला, तसा राजांनी भोवताली असलेल्या अंगरक्षकांना थांबण्याची इशारत केली. कृष्णाजी भास्कर राजांना आत नेण्यास “या, आत या’ म्हणत अगाचा आग्रह करत होते. आधी कृष्णाजी आत गेले, नि मग ‘जगदंब’ म्हणून राजांनी पहिले पाऊल शामियानाच्या आत ठेवले! सिंह आत शिरला!

काही काळ स्तब्ध राहिला. खान आणि महाराजांची नजर एक-मेकांच्या नजरेत विसावून गेली होती. मौन युद्ध तिकडेच आरंभ झाला असावा!

काळाची शांतता खानाच्या प्रश्नाने भंग झाली!

“आओ शिवाजी, आओ!! अब तक तो हम सिर्फ तुम्हारे नाम और कीर्तियो बेख़ूब वाक़िफ़ थे, लेकिन आज तुम्हें देख भी लिया! अपने पिता शहजीराजे से तुम्हारी शक्ल काफ़ी मिलती है!”

“काकाजान आम्ही पण आजपर्यंत फक्त तुमचे किस्से ऐकले होते, पण आज प्रत्यक्ष बघून हमे अपनी आँखों पर विश्वास नही हो रहा!”

“हाँ हाँ हाँ!! बोहोत खूब शिवाजी.., बोहोत ख़ूब! तुम्हारे बोल काबिल-ए-तारीफ़ है!”

“और आपकी देहयष्टी उससे भी शानदार है….!, काकाजान!”

“वल्लाह! शानदार जवाब शिवाजी! अब खड़े क्यों हो.., तशरीफ़ रखो!”

“तशरीफ़ तो ज़रूर रखेंगे काकाजान…, लेकिन सबसे पूर्व… वो नियम तो पूरा हो जाए जो शर्यत में क़ुबूल किया था।” असे म्हणून राजांनी आपली तलवार काढून कृष्णाजींच्या हातात थोपवली. पुढे खानाने देखील आपली शमशीर गोपीनाथ पंतांच्या हाती सोपवली. नियम पार पडले….

“तो आप अपनी गलती क़ुबूल करते है शिवाजी. आप अदिलशाही से गिरफ़्त की हुए जहांगीर वापस लौटाते है और हमारे शरण में आना चाहते है ऐसा अपने फ़रमान में लिखा था।”

“जी।”

“बेहत खूब! हम हुकूमत से ये फरमश्त करेंगे की आपको इसके बदले में गिरफ़्ती से एक चौथाई जहांगीर का हिस्सा दिया जाए! अब तो आप हमारे शत्रु नही रहे! आओ शिवाजी आओ…! अपने काकाजान के गले लग जाओ!”

अफजलखान त्याच्या आसनावरून उठला आणि त्याने आपले हात आलिंगन द्यायला पुढे केले; तसे धीर गंभीर मुद्रेत राजे शिवाजी त्यांच्या आसनावरून उठले. डोळे एक मेकांच्या डोळयात अगदी ठिपून गेली होती.

एकही क्षण ती नज़रेखा विसकळली नाही. राजांची पावलं मंद गतीने समोर वाढत होती. दुसरेच क्षण काय होऊ शकते हे कुणास ठाऊक होते? सर्प केव्हा फणा काढेल याची जाणीव फक्त सर्पालाच! ते दोन शत्रू जवळ आले आणि राजांनी आपले अंग खानाच्या अंगाला हळूच स्पर्श केले. दोन आलिंगन तर विश्वासाचे होते, पण तिसरे आलिंगन गद्दारीचे!!!! त्या तिसऱ्या आलिंगनात उंच धिप्पाड खानाने राजांचा गळा त्यांच्या बाहूत घट्ट दाबून दिला! आणि मग त्या राक्षसाने आपल्या पोशाखात लपवलेल्या कटारीला सर्पाचं रूप दिलं! तो सर्प महाराजांच्या पाठीवर दंश करायला सुळत सुटला, पण पहिल्या दोन वारात अंगात घातलेल्या लोहत्राणेमुळे ते दंश काही ठिपले नाही! हे छळ बघताच गोपीनाथपंतांनी आपली तलवार सरती केली, पण शेजारी असलेल्या कृष्णाजी भास्कराने त्याच क्षणी त्याला जखमी करून दिले! राजे संकटात होते! आता काय करायचं? हा खान तर गद्दार निघाला! त्याने आपला विश्वास घात केला! आई जगदंबे!! आज छळाचा जवाब आम्ही छळानेच देऊ! "जय भवानी !!!!!!!!!!" ही गर्जना करून हातात घातलेल्या राजांच्या वाघनखांनी सरळ त्या छळीच्या उदरात जोरदार वार केला! तो वार त्या सर्पाच्या दंशावरून कितपत मोठा होता, ज्याने त्या पापीचे उदर सीधे बाहेर खोम्बुन आले!!

हे बघताच कृष्णाजीने महाराजांवर वार केला, पण महाराजांनी तो रोखला आणि "आम्ही ब्राह्मणांवर वार नाही करत पंत!" म्हणून त्याला जीवनदान दिले. पण सर्प तो सर्पच! तो नाही थांबला. तीन वार महाराजांनी सोसले, अन चौथा वर झाला तो महाराजांचा!!

बाहेर खळबळ उडाली! मराठी मावळे लढत होते! उदर फाटलेल्या अफजलखानाला जखमी बघताच सय्यद बंड मागून धावत आला आणि त्याने

मागून महाराजांवर वार केले.., पण त्याच क्षणी जीवा महालाने ते वार रोखले नि शत्रूचे हात त्याच्या मुळासकट उपसून दिले! ‘होता जीवा…, म्हणून वाचला शिवा!”

बाहेर मराठी सैन्यबळ शत्रूंवर तुटून पडलं! महाराज थोडे जखमी झाले होते, आणि ते शामियानाच्या बाहेर चालते झाले.., तसा जखमी खानही ओरडत ओरडत बाहेर आला नि सरळ जमिनीवर मूर्च्छित कोसळला. संभाजी कावजीने धगधगत्या तलवारीच्या धारिने त्या सर्पाचे मुख कापून दिले! विष पावता झाला! अखेरीस….. शत्रू मेलाच! मराठ्यांची फते झाली! पण या युद्धात फजल खान आणि आपलाच एक हरामखोर खंडोजी सुटून गेला……!! शत्रूहून मोठा शत्रू हा विश्वासूच!

विजय आली!!! जल्लोष उठला! ज्याने विश्वासघात केले, त्याने प्राण गमावले! इतिहासाने जे सत्य पाहिले, त्याला साक्षी आहे- तो काळ, ती वेळ, नि तो प्रतापगड! जो शत्रूच्या हरामी रक्तात त्या दिवशी न्हाऊन निघाला, तेव्हा नक्कीच, ते सारे भूतकाळ निश्चिन्त झाले…. त्यांना समाधान वाटलं! गुंजला!!जय भवानीचा नाद गुंजला !!! उदो उदो … त्या जगदंबेचा उदो!

जय भवानी!

जय शिवाजी !!!!!

# आखणुक...

नमस्कार!! त्या नवीन आणि काही जुन्या वाचकांना!

ही माझी प्रथम ऐतिहासिक लघुकथा! ‘राजप्रतीपत्य’ हे नाव कदाचित प्रख्यात होईल अशी आशा आहे. हे कादंबरी लिहायचं असं काही माझा ठराविक आणि सुनिश्चित विचार नव्हता. सध्या बारावीचा अभ्यासक्रम काही जास्तच अंगावर आला; मला ही असे वाटत आहे नीट नावाचा अफजलखान आपल्या शामियानात आला आहे😅!

सात दिवसांपूर्वीची ही गोष्ट! मी पुण्याला जायला निघालो होतो! जीवनात पहिल्यांदा एकटा प्रवास केला! फार लांब प्रवास.... बसल्या बसल्या काय करायचं हा विचार आला! विचार येताच मन उत्तरले- लिही! काहीतरी ऐतिहासिक लिही!

मानाने सांगितले.....आणि प्रयत्न सुरु झाले! आवड अशीच असते ना?

ऐतिहासिक लिहायचं म्हणजे सुरुवातीपासून शेवटपर्यंत लिहायचं असं मला वाटते. अर्धवट लिहिणं म्हणजे अल्पज्ञान आहे असे मला वाटते. मनात इच्छा आणि संकल्पना तर खूप येतात... पण हा काळ, हि वय आणि हे भव्य अभ्यासक्रम देखील माझ्याच गळ्याशी आहे, जे कितपत दर वेळी मला सांगत असतात- ‘आम्ही आहो आता जिवंत..., पहिली शिबंदी आम्हाला कसा देऊ शकतो तू?’

फार गुंतागुंतीची कहाणी आहे रे बाबा! पण संकल्पना आपण मारायची नसते, ते पूर्ण करायचीच असते! आता बघा ना! हे मनोगत मी आपल्या चालत्या कॉलेजात बसून लिहितो आहे! क्या करणार... आधीचे दोन वर्ग सुटले, आता मधातून काय कळणार? चला, लिहा!!

ऐतिहासिक कादंबरी लिहायला परिश्रम लागतेच! जे माझे आवडते काम आहे... पण फक्त लेखनाप्रती 😅.

असो.

तरीपण कुठेतरी वाटतं की आपण अल्पज्ञानाने ही लेखणी केली आहे. त्यास मी आपला क्षमाप्रार्थी आहे. संवाद, रणनीती, बोलींची आखणूक हे प्रत्यक्ष संदर्भांशी काष्ठाकोष्ठ संलग्न नाही. हे लेखनाला वाव देण्याची एक प्रक्रिया आहे, जो प्रत्येक लेखक करतच असतो. मुख्य म्हणजे आपण इतिहासही लीन व्हावं, ते वाचावं आणि इतरांना सांगावं हे लेखनामागचं मूळ उद्देश्य! शिवाजी महाराज आणि अफजलखान यांचा द्वंद्वव सर्वांना माहित होता, पण अफजलखानाचे 65 बायका आणि साठ कब्र चे रहस्य फार कमी लोकांना ठाऊक असावे! 'जुमिया' हे नाव काल्पनिक आहे कारण ते संदर्भ डोळ्यांसमक्ष नाही. ही शूरकथा बाबासाहेब देशमुखांच्या पोवाड्यातून सार्थ झाली आहे, आणि हे समर्पित देखील त्यांनाच आहे! त्यांचे पोवाडे मला सर्वात जास्त मदतगार झाले! मी त्यांचा ऋणी आहे!

वाचकांनो! आता काय सांगायचं? असं बोलण्यात मजा नाही. पुस्तकातून बोलूया… खूप खूप बोलूया! तुम्ही कळवा, तुम्हास काय हवंय! ते नक्कीच माझ्याकडनं सार्थ होईल!!

ई साहित्य व त्यांच्या पूर्ण टीमचे मनापासून आभार!

कळावे.

प्रद्युम.



“प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता ।।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।”

**कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?**

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?
खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!
थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.
ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.
एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग
दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग
थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय
कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?


ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा.

आनंद घ्या. आनंद द्या.

**Free Whatsapp book service: 9987737237**

www.esahity.com

esahity@gmail.com